सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ११ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# किरीट सोमय्या वापस जाओच्या घोषणांनी दुणाणली महापालिका

## मनपा परिसरात तणावपूर्ण वातावरण, एम आय एम च्या नगरसेवकांचा प्रचंड विरोध







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

भाजपचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या आणि वाद यांचे समीकरण अजूनही घट्ट असल्याचा प्रत्यय आज अमरावतीत आला. किरीट सोमय्या हे अमरावती महापालिकेत बैठकीसाठी येत असताना एमआयएमच्या नगरसेवकांनी त्यांना जोरदार विरोध केला आणि घोषणाबाजी केली. त्यामुळे महापालिका परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यातच एमआयएमच्या काही नगरसेवकांनी किरीट सोमय्या यांच्या वाहनासमोर आडवे होत त्यांची वाट अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी या नगरसेवकांना लगेच ताब्यात घेतले.

### महापालिकेत प्रचंड घोषणाबाजी

महापालिकेच्या परिसरात किरीट सोमय्या यांच्या वाहनांचा ताफा येताच एमआयएमचे नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी 'किरीट सोमय्या वापस जाओ' अशा घोषणा देण्यास सुरूवात केली. यावेळी भाजपचे आणि एमआयएमचे कार्यकर्ते आमने-सामने आले. पण, यावेळी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना पांगवले. एमआयएमचे नगरसेवक विरोधाच्या घोषणा देत किरीट सोमय्या यांच्या वाहनापर्यंत पोहचले. ते चक्क वाहनासमोर रस्त्यावरच झोपले. त्यांना हटविण्यासाठी पोलिसांना बरेच परिश्रम घ्यावे लागले.

किरीट सोमय्या हे अमरावती महापालिकेत बैठकीसाठी येणार असल्याने पोलिसांनी आधीच चोख बंदोबस्त ठेवला होता. एमआयएमच्या आंदोलनानंतर या परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. किरीट सोमय्या हे कोणत्याही संवैधानिक पदावर नाहीत, त्यामुळे त्यांना महापालिकेत बैठक घेण्याचा कोणताही अधिकार नाही, असाा आरोप एमआयएमच्या नगरसेवकांनी केला आहे. दरम्यान, पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या एमआयएमच्या नगरसेवकांना ताब्यात घेतले आहे.

किरीट सोमय्या हे वारंवार अमरावतीत येऊन महापालिकेत बैठका घेतात, यावर काँग्रेसनही आक्षेप घेतला होता. किरीट सोमय्या हे वारंवार जिल्ह्यात येऊन येथील पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेला वेठीस धरत आहेत.

त्यांच्यावर दबाव आणत आहेत. काही प्रकरणांमध्ये खोट्या दाखल्यांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र मिळवल्याचे पुढे आले आहे. त्यात यंत्रणेमार्फत पोलीस तक्रारही झाली आहे.

परंतु त्या प्रकरणांतही कुणी बांगलादेशी किवा रोहिंग्याशी संबंधित असल्याचे पुढे आले नाही. त्यामुळे सोमय्या यांनी जाणीवपूर्वक अमरावती जिल्ह्याची बदनामी करीत असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

#### महसूल यंत्रणा धास्तावलेली

किरीट सोमय्या यांच्यामुळे महसूल यंत्रणा धास्तावलेली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरण पात्र असताना व दाखले देण्याबाबतचा बंदी आदेश मागे घेण्यात आल्यानंतरही अनेक विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात आहे. सध्या शैक्षणिक कामकाजासाठी विद्यार्थ्यांना अनेक दाखल्यांची गरज आहे. मात्र त्यांना ती दिली जात नाहीत. त्यामुळे अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची अडवणूक थांबवावी, अशी मागणी एमआयएम च्या नगरसेवकांनी केली आहे..

# किरीट सोमय्याना एमआयएमचा विरोध म्हणजे राजकीय नैराश्याचे लक्षण - चेतन गावंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती-** माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या अमरावती दौऱ्याला एमआयएम पक्षाने केलेला विरोध हा जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकारणाला प्राधान्य देणारा आहे. जन्म-मृत्यू दाखल्यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होऊ नये, प्रशासनाची जबाबदारी निश्चित होऊ नये आणि जनतेसमोर वास्तव येऊ नये यासाठी हा विरोध करण्यात आला असल्याचे दिसून येते.

एमआयएमकडे जनतेच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी कोणतेही ठोस काम नसल्यामुळे ते केवळ विरोधाचे राजकारण करत आहेत. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याऐवजी जे लोक प्रश्न उपस्थित करतात त्यांनाच विरोध करण्याचे काम एमआयएम करत आहे. हा विरोध अमरावतीच्या जनतेचा नसून स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी सुरू असलेल्या धडपडीचा भाग आहे.

माजी खासदार किरीट सोमय्या यांनी जन्म मृत्यू दाखल्याची प्रशासनाकडून माहिती जाणून घेण्यासाठी भेट दिली होती. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही लोकप्रतिनिधीला किंवा माजी



लोकप्रतिनिधीला जनतेच्या प्रश्नांवर प्रशासनाला जाब विचारण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारालाच विरोध करणे म्हणजे लोकशाही मूल्यांचा अपमान आहे.एमआयएमने विकास कामाचा प्रश्न सोडविण्याऐवजी प्रत्येक विषयाला राजकीय रंग देण्याची सवय सोडावी. अमरावतीची जनता विकास, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवते, संघर्ष आणि दिशाभूल करणाऱ्या राजकारणाची नाही.

भारतीय जनता पक्ष नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करत राहील. जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्यांना विरोध करून कोणीही सत्य दडपून ठेवू शकत नाही. अमरावतीची जनता सर्व पाहत आहे आणि योग्य वेळी अशा दुटप्पी राजकारणाला लोकशाही मार्गाने चोख उत्तर देईल.-

# निमगव्हाण येथे प्रतिबंधित HTBT कपाशी बियाण्यांचा ७.१२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## तळेगाव दशासर पोलिस व कृषी विभागाच्या संयुक्त कारवाईत ४३२ पॅकेट जप्त; एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ धा.रेल्वे** तळेगाव दशासर पोलीस स्टेशन आणि कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने संयुक्त कारवाई करत निमगव्हाण (ता. चांदूर रेल्वे) येथून प्रतिबंधित एचटीबीटी (कढइढ) कपाशी बियाण्यांचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत ७ लाख १२ हजार ८०० रुपयांचे ४३२ पॅकेट बियाणे हस्तगत करण्यात आले असून एका आरोपीविरुद्ध विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शासनाने पर्यावरणीय परिणाम लक्षात घेऊन



कढइढ (हर्बिसाईड टॉलेरंट बॅसिलस थुरीजियांसिस) कपाशी वाणावर बंदी घातली आहे. मात्र, काही व्यक्ती प्रतिबंधित व अप्रमाणित बियाण्यांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक (ग्रामीण) निकेतन कदम यांना मिळाली होती. त्यानंतर अशा बियाण्यांच्या विक्रेत्यांवर कारवाईचे आदेश देण्यात आले होते.याच अनुषंगाने १० जून रोजी तळेगाव दशासर पोलिसांचे पथक गस्त घालत असताना ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण औटे यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार ग्राम निमगव्हाण येथील शेतशिवारात राजकुमार व्यंकटराव परबत यांच्या शेतातील खोलीत प्रतिबंधित कढइढ कपाशी बियाण्यांचा साठा असल्याची खात्री झाल्यानंतर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह संयुक्त छापा टाकण्यात आला.छाप्यात शुभमसिंग बलजितसिंग चौधरी (वय २१, रा. धामणगाव रेल्वे) हा संशयित आढळून आला. पंचांसमक्ष तपासणी केली असता कोहिनूर ब्रँडचे ५६, ग्लायको गार्ड ब्रँडचे १४०, विराट ब्रँडचे १५५ आणि महाराजा ब्रँडचे ८१ अशा एकूण ४३२ पॅकेट प्रतिबंधित कढइढ कपाशी बियाणे आढळून आले. प्रति पॅकेट १,६५० रुपये किंमत असलेल्या या बियाण्यांची एकूण किंमत ७,१२,८०० रुपये आहे.कृषी अधिकारी तथा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक रवी महादेवराव राणे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध तळेगाव दशासर पोलीस ठाण्यात बीज अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम, अत्यावश्यक वस्तू अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अमरावतीत काँग्रेसमध्येच 'वॉर'

## यशोमती ठाकूर म्हणाल्या- १५ कोटी घेत हर्षजित झाले मॅनेज



## मी नाही त्याच भाजपला मॅनेज, देशमुखांचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर आला आहे. काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख यांच्यावर माजी मंत्री आणि काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी १५ ते २० कोटी रुपये घेऊन मॅनेज झाल्याचा गंभीर आरोप केल्यानंतर देशमुख यांनीही तितक्याच आक्रमक शब्दांत पलटवार केला आहे.

नागपूरमधील खासगी रुग्णालयातूनच माध्यमांशी संवाद साधताना देशमुख यांनी थेट यशोमती ठाकूर यांच्यावरच भाजपला मदत करत असल्याचा आरोप केला. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसमधील अंतर्गत कलह उघडपणे समोर आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशमुख निवडणुकीतून माघार घेणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यावर त्यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. मी निवडणुकीतून माघार घेतलेली नाही आणि घेणारही नाही. मी अजूनही काँग्रेसचा अधिकृत उमेदवार आहे. पक्षाने पुढे काय निर्णय घ्यायचा तो घेईल, पण मी मैदानात कायम आहे, असे देशमुख यांनी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, माझा मतदारांशी संपर्क सुरू आहे. सध्या डिजिटल माध्यमातून प्रचार करत आहे. डॉक्टरांनी डिस्चार्ज दिल्यानंतर अमरावतीत जाऊन प्रत्यक्ष प्रचार करणार आहे.

देशमुखांच्या आरोपांना उत्तर देताना यशोमती ठाकूर यांनी पुन्हा एकदा त्यांच्यावरच निशाणा साधला. जर तुम्ही खरोखरच निवडणूक लढवत असाल तर रुग्णालयातून बाहेर या आणि मैदानात उतरा. निवडणुकीला अवघे चार-पाच दिवस राहिले आहेत. हॉस्पिटलमध्ये बसून नाटक करण्यापेक्षा मतदारांमध्ये जा, असे त्या म्हणाल्या.त्यांनी पुढे म्हटले की, देशमुख यांची सर्व वक्तव्ये भाजपला फायदा होईल अशीच आहेत. डिजिटल माध्यमातून प्रचार करतोय हे म्हणणे हास्यास्पद आहे. त्यांच्यात दम असेल तर त्यांनी प्रत्यक्ष प्रचार करून दाखवावा.अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या प्रचारादरम्यान हर्षजित देशमुख अचानक संपर्काबाहेर गेल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यानंतर ते नागपूरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल असल्याचे समोर आले. याच पार्श्वभूमीवर यशोमती ठाकूर यांनी देशमुख हे १५ ते २० कोटी रुपये घेऊन मॅनेज झाल्याची चर्चा असल्याचा दावा केला. तसेच या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

#### मी मॅनेज होणारा माणूस नाही

हर्षजित देशमुख म्हणाले की, माझी प्रकृती बिघडल्यामुळे मी रुग्णालयात दाखल आहे. मात्र, माझ्या तब्येतीची विचारपूस न करता माझ्यावर बिनबुडाचे आरोप करण्यात येत आहेत. मला भेटायला काँग्रेसचे मोजकेच नेते आले. माझी तब्येत कशी आहे, याची माहितीही घेतली नाही आणि थेट आरोप सुरू झाले. मी मॅनेज होणारा व्यक्ती नाही. उलट यशोमती ठाकूरच भाजपला मॅनेज झाल्या असाव्यात. त्यांना काँग्रेसचे नुकसान करून भाजपला फायदा करून द्यायचा आहे, असा थेट आरोप त्यांनी केला.

### अमरावतीतील निवडणूक आणखी रंगणार

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणूक आधीच चुरशीची मानली जात होती. मात्र आता काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षामुळे ही लढत अधिकच गाजू लागली आहे. एकीकडे यशोमती ठाकूर देशमुख यांच्यावर भाजपशी संगनमताचा आरोप करत आहेत, तर दुसरीकडे देशमुख याच ठाकूर भाजपला मदत करत असल्याचा पलटवार करत आहेत. त्यामुळे मतदानाच्या आधी काँग्रेसमधील हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# तुकाराम मुंढे विदर्भ-मराठवाड्याच्या दौऱ्यावर!

## भेसळखोर आणि तस्करांचे धाबे दणाणले

### सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर-** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे लवकरच विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशात दौऱ्यास निघणार आहेत. दौऱ्याचा उद्देश राज्यभर सुरू असलेल्या भेसळखोर आणि तस्करांवर कारवाई आणखी वाढवणे असल्याच्या पोस्ट समाज माध्यमांवर तुकाराम मुंढे यांच्या समर्थकांनी प्रसारित केले आहे. आयुक्त मुंढे यांच्या अचानक तपासणीमुळे हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, डेअरी, किरकोळ दुकाने व औषध विक्रेते सतर्क झाले आहेत.

आयुक्त तुकाराम मुंढे यांचा विदर्भ आणि मराठवाडा दौरा प्रशासनाची काटेकोर पद्धत आणि लोकांच्या आरोग्यावरील कारवाईचा आणखी कठोर संदेश देण्याचे संकेत आहे. या दौऱ्याची कुजबुज लागल्याने भेसळखोरांची झोप उडालेली आहे, आणि व्यवसायांनी नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.आयुक्त मुंढे यांचा दौरा मुख्यतः लोकांच्या आरोग्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आहे. भेसळयुक्त, प्रतिबंधित किंवा



नियमविरोधी पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यवसायांवर लक्ष ठेवणे, नियमांचे काटेकोर पालन होईल याची खात्री करणे, तसेच औषध व अन्न क्षेत्रातील पारदर्शकता वाढवणे या दौऱ्याचे मुख्य उद्देश आहेत.

राज्यभरातील हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, खाद्यपदार्थ उत्पादक, डेअरी, किरकोळ दुकाने, मेडिकल स्टोअर्स आणि इतर व्यवसायिक प्रतिष्ठान या दौऱ्याच्या यादीत आहेत. प्रत्येक ठिकाणावर ऋऊ- नियमांचे पालन केले जात आहे की नाही, हे पाहिले जाईल.

## संपादकीय ......

# ‘पाण्याचा सातबारा’ गरजेचा; पण...

*‘जल सातबारा’मुळे प्रत्येक गावाची जल ताळेबंद पद्धतीने माहिती उपलब्ध होईल. पाण्याचे वार्षिक लेखापरीक्षण होणार असेल, तर प्रथमच पाण्याविषयी जबाबदारीची संस्कृती विकसित होऊ शकते.*

*महाराष्ट्राने ‘पाण्याचा सातबारा’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा घेतलेला निर्णय भविष्यातील जलसंकटाला उत्तर शोधण्याच्या दृष्टीने उचललेले दूरदर्शी पाऊल मानावे लागेल. जमिनीच्या मालकी, क्षेत्रफळ आणि वापराची माहिती सातबारा उताऱ्यावर उपलब्ध असते; त्याच धर्तीवर एखाद्या गावात किती पाऊस पडतो, त्यातील किती पाणी साठवले जाते, किती भूगर्भात झिरपते, किती वापरले जाते आणि किती वाया जाते, याची नोंद ठेवणारी ‘जल सातबारा’ प्रणाली राज्यात विकसित होणार आहे.*

*भारतात पाण्याविषयीची सर्वात मोठी समस्या म्हणजे माहितीचा अभाव. किती पाणी उपलब्ध आहे, किती वापरले जाते, किती वाया जाते आणि कोणत्या क्षेत्रात किती गरज आहे, याचे अचूक नोंदवही स्वरूपातील व्यवस्थापन आजही बहुतेक ठिकाणी नाही. ‘जल सातबारा’मुळे प्रत्येक गावाची जल ताळेबंद पद्धतीने माहिती उपलब्ध होईल. पावसाचे प्रमाण, तलाव-बंधारे-धरणांमधील साठा, भूजलपातळी, पुनर्वापराचे प्रमाण, शेती व उद्योगांसाठीचा वापर, घरगुती गरजा आणि अपव्यय यांचे वार्षिक लेखापरीक्षण होणार असेल, तर प्रथमच पाण्याविषयी जबाबदारीची संस्कृती विकसित होऊ शकते. जल लेखांकनामुळे स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती आणि नागरिक यांच्यावर उत्तरदायित्व निश्चित होऊ शकते. आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ‘डेटा-आधारित जलव्यवस्थापन’. एखाद्या गावात कोट्यवधी रुपये खर्च करून बंधारे बांधले, तरी प्रत्यक्षात भूजल किती वाढले, शेतीला किती फायदा झाला किंवा टँकरवरील अवलंबित्व किती कमी झाले, याची आकडेवारी उपलब्ध नसते. जल सातबारा प्रणालीमुळे योजनांचे परिणाम मोजता येतील आणि निधीचा वापर अधिक परिणामकारकपणे करता येईल.तथापि, ही योजना यशस्वी होण्यासाठी काही मूलभूत अटी पूर्ण कराव्या लागतील. पहिली म्हणजे विश्वसनीय आणि सातत्यपूर्ण माहिती संकलन. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पर्जन्यमापन यंत्रणाच अपुरी आहे. भूजल मोजणीची व्यवस्था मर्यादित आहे. अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याची अचूक नोंदही ठेवली जात नाही. त्यामुळे जल सातबारा फक्त कागदोपत्री उपक्रम ठरू नये, यासाठी तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करावा लागेल. उपग्रह नकाशे, भूजल सेन्सर, डिजिटल नोंद प्रणाली आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर करून जलमाहिती अधिक अचूक करणे आवश्यक आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे स्थानिक लोकसहभाग. पाण्याचे नियोजन केवळ मंत्रालयातून होऊ शकत नाही. ग्रामसभा, शेतकरी गट, महिला बचत गट आणि स्थानिक संस्था यांना प्रक्रियेत सामील करावे लागेल. कारण, पाण्याचा वापर नियंत्रित करण्यासाठी सामाजिक शिस्त तितकीच आवश्यक आहे. एखाद्या गावात किती पाणी उपलब्ध आहे आणि त्यानुसार कोणती पिके घ्यावीत, किती विहिरी खोदाव्यात किंवा पुनर्वापर किती वाढवावा, याबाबत सामूहिक निर्णय घ्यावे लागतील. तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. महाराष्ट्रातील पाणीप्रश्न अनेकदा निवडणूक आणि साखर राजकारणाशी जोडले गेले आहेत. त्यामुळे ‘जलसातबारा’ हा केवळ घोषणात्मक उपक्रम न राहता दीर्घकालीन धोरणाचा भाग बनणे आवश्यक आहे.*

*‘जल लेखांकन’ किंवा ‘वॉटर अकाऊंटिंग’ व्यवस्थेमध्ये एखाद्या प्रदेशात किती पाणी उपलब्ध आहे, त्यातील किती पृष्ठभागावरील आणि किती भूजल आहे, त्याचा वापर शेती, उद्योग, घरगुती गरजा किंवा पर्यावरणीय गरजांसाठी किती प्रमाणात होतो, किती पाणी पुनर्वापर होते आणि किती वाया जाते, याची नियमित नोंद ठेवली जाते. यामुळे पाण्याच्या वापराचे अचूक नियोजन शक्य होते आणि भविष्यातील टंचाईचा अंदाजही बांधता येतो. इस्रायल हे जल लेखांकन आणि जलव्यवस्थापनाचे सर्वाधिक यशस्वी उदाहरण मानले जाते. अत्यल्प पर्जन्यमान आणि मर्यादित नैसर्गिक जलस्रोत असूनही इस्रायलने प्रत्येक थेंबाचा वैज्ञानिक वापर करण्याची प्रणाली विकसित केली. ऑस्ट्रेलियानेही दीर्घकालीन दुष्काळानंतर नदीखोऱ्यानुसार जलहिशेब प्रणाली लागू केली. किती पाणी शेतीसाठी, पर्यावरणासाठी किती राखून ठेवायचे आणि उद्योगांना किती द्यायचे यासाठी स्वतंत्र नियामक व्यवस्था उभी केली. उपग्रह तंत्रज्ञान, डिजिटल नोंदवही आणि भूजल निरीक्षणाच्या मदतीने पाण्याचा वापर सतत मोजला जातो. यामुळे अनियंत्रित उपसा कमी झाला आणि जलनियोजन अधिक पारदर्शक झाले. सिंगापूरने तर जलव्यवस्थापनाला राष्ट्रीय सुरक्षेचा भाग मानले आहे. या उदाहरणांवरून स्पष्ट होते की, जलसंकटावर मात करण्यासाठी केवळ धरणे बांधणे पुरेसे नसते; तर उपलब्ध पाण्याचा वैज्ञानिक हिशेब, पुनर्वापर आणि शिस्तबद्ध व्यवस्थापन तितकेच आवश्यक असते.*

# पंतप्रधान मोदींच्या दीर्घायुष्यासाठी अंबादेवी-एकवीरा मंदिरात महाआरती

### १२ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त भाजपकडून आयोजन: खा. बोंडे यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेतून निवडून येत सलग ४३९९ दिवस पंतप्रधानपद भूषवून नवा विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त भाजपतर्फे अमरावतीचे आराध्य दैवत श्री अंबादेवी व श्री एकवीरा देवी मंदिरात महाआरती करण्यात आली. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाआरती पार पडली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी तसेच भारत राष्ट्राच्या निरंतर प्रगतीसाठी



देवीचरणी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनी मोदी सरकारच्या गेल्या बारा वर्षांतील विविध विकासकामांचा गौरव करत विकसित भारताच्या संकल्पनेला पाठिंबा व्यक्त केला.या कार्यक्रमाला खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी महापौर श्रीचंद तेजवानी, चेतन गावंडे, आशिष अतकरे, मीनाताई पाठक,सुरेंद्र बुरंगे, प्रशांत देशपांडे, संजय तीरथकर, निवेदिता चौधरी, संजय नरवणे, मिलिंद बांबल, राधाताई कुरील, चेतन पवार, सुधा तिवारी, स्वाती कुलकर्णी, सचिन रासने, राजेंद्र मेटे, गजानन देशमुख, राजेश आखेगावकर, स्मिताताई सूर्यवंशी, विक्की शर्मा, यांच्या सह शेकडो पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# गुटख्याची तस्करी करणारा पोलीस पंकज दवंडे निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्याला शेंदूरजनाघाट पोलिसांनी गुटख्याची तस्करी करणाताना रंगेहात पकडल्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आज त्याच्यावर निलंबनाची कारवाई केली. शहर पोलीस आयुक्तालयातील आरसीपी फोर्समध्ये कार्यरत पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याला शेंदूरजनाघाट पोलिसांनी (दि.७) जूनच्या मध्यरात्री स्वतःच्या कारमध्ये गुटख्याची अवैध वाहतूक करताना पकडले होते. त्यावेळी त्याच्या ताब्यातून २ लाख ४७ हजार ८० रुपयांचा गुटखा व स्विप्ट डिझायर कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक केली. * मंगळवारी त्याला न्यायालयाने न्यायालयीन

> पुढील कार्यवाही सुरू अहवाल मिळताच बुधवारी पोलीस कर्मचारी दवंडे याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. पुढील कारवाई सुरु आहे.
>
> **– रमेश धुमाळ,** पोलीस उपायुक्त.



कोठडी सुनावली. तो सध्या कारागृहात आहे. दवंडे याची पोलिसांनी कसून चौकशी केली असता तो स्वःच्या फायद्यासाठी गुटख्याची अवैध वाहतूक करीत असल्याचे तपासात उघड झाले. त्यामुळे शेंदूरजनाघाटपोलिसांनी तसाच अहवाल शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांना पाठविला. आयुक्तांनी त्याच्या विरूध्द निलंबनाची कारवाई करून चौकशी सुरू केली आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात एका बेडवर दोन रुग्णांवर उपचार

### वॉर्ड क्रमांक १३ आणि १४ बंद असल्याने वाढला ताण: प्रशासनाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

अकोल्यातील शासकीय रुग्णालयात स्ट्रेचर अभावी रुग्णाला पाठीवर घेऊन जाण्याची घटना ताजी असतानाच जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथील वॉर्ड क्रमांक ६ मध्ये एका बेडवर दोन रुग्णांवर उपचार सुरू असल्याचे समोर आल्याने आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील बेडचा तुटवडा आणि वाढत्या रुग्णभाराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका बेडवर दोन रुग्णांवर उपचार करण्यात येत असल्याने नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. तसेच रुग्णांना



गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची चर्चा आहे. दरम्यान, या प्रकरणात रुग्णालय प्रशासनाने वार्ड क्रमांक ६ मध्ये दाखल रुग्णांची संख्या जास्त होती. त्यामुळे काही काळासाठी अशी व्यवस्था करण्यात आली असावी. मात्र, ही नियमित बाब नाही. दुसऱ्या वॉर्डमध्ये जागा उपलब्ध होताच संबंधित रुग्णांना तेथे हलविण्यात येते, वार्ड क्रमांक १४ चे स्ट्रक्चरल ऑडिट सुरू असल्यामुळे तसेच संबंधित कामांमुळे वार्ड १३ देखील बंद ठेवण्यात आला आहे.त्यामुळे काही प्रमाणात बेडवर रुग्णांचा ताण निर्माण झाला आहे. या घटनेमुळे जिल्हा सामान्य रुग्णालयातील सुविधा, नियोजन आणि रुग्ण व्यवस्थापनाबाबत प्रश्न उपस्थित होत असून, रुग्णांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# डिटेक्शन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गुन्हे शाखेत जागा

## काम न करणाऱ्यांची होणार उचलबांगडी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

गुन्हे उघडकीस आणणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच गुन्हे शाखेत कार्यरत राहण्याची संधी मिळेल आणि जे कर्मचारी कामच करित नसतील तर अशा कर्मचाऱ्यांची लवकरच गुन्हे शाखेतून उचलबांगडी केली जाईल, अशी भूमिका पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी घेतली आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आठ दिवसांपूर्वीच आयुक्तालयातील १५८ पोलीस कर्मचाऱ्यांच्या सर्वसामान्य बदल्या केल्या आहेत. यामध्ये गुन्हे शाखेतील केवळ पाच कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यापैकी एका कर्मचाऱ्याला एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. तर चार कर्मचाऱ्यांची पोलीस स्टेशन व मुख्यालयात बदली केली आहे. परंतु नव्याने गुन्हे शाखेत कुठल्याच कर्मचाऱ्याची भरती करण्यात आली नाही.

शहरात सध्या गुन्हे शाखेचे दोन वेगवेगळे युनिट गठीत करण्यात आले असून शहरात फिल्डवर काम करणारे ३५ कर्मचारी आहेत. कार्यालयीन कामकाजाकरिता १६ कर्मचारी असे एकूण ५१ महिला व पुरुष कर्मचारी गुन्हे शाखेत कार्यरत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात गुन्हे शाखेत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना गुन्हे उघडकीस आणणे, धाडी टाकणे, आरोपींचा शोध घेणे अशा प्रकारचे काम गुन्हे शाखेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याने करणे गरजेचे



आहे. जो कर्मचारी काम करीत नसेल, गुन्हे डिटेक्ट करीत नसले अशा कर्मचाऱ्यांना गुन्हे शाखेतून कमी करण्यात येणार, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सांगितले. आगामी काळात ज्या कर्मचाऱ्यांचे डिटेक्शन दिसेल तेच कर्मचारी गुन्हे शाखेत राहतील, अन्यथा काम न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ड्युटीपास व पोलीस स्टेशन किंवा मुख्यालयात संलग्न ण्यात येईल, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी करण्यात सांगितले

# शस्त्रांसह इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करणारे तिघे जेरबंद

### राजापेठ पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

हातात घातक शस्त्रे घेऊन इंस्टाग्रामवर फोटो व्हायरल करणाऱ्या तिघांना राजापेठ पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून तलवार, फरशा आणि गुमी अशी शखे जाम केली. तसेच गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली. रोहित अरविंद महाजन (वय २४), तेजस भारत भोंगे (वय २१) आणि प्रतीक शिवाजी कापसे (वय २५ तिन्ही रा. हमालपुरा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. राजापेठ पोलीस बुधवारीपरिसरात गस्तीवर असताना तीन युवकांनी हातात घातक शस्त्रे घेऊनइंस्टाग्रामवर स्वतः चे फोटो व्हायरल केल्याची माहिती मिळताच पोलीस त्यांच्या शोधात होते. तेव्हा तिन्ही युवक हमालपुरा येथून दुचाकीने जात असल्याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि तिघांना ताब्यात घेतले.तसेच त्यांच्याजवळून तीन शखे



जप्त केली. त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करून अटक केली. या कारवाईत ठाणेदार संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार मनीष करपे, पंकज खटे, रबि लिखितकर आणि अर्जुन कदम यांचा समावेश होता.-

# अनधिकृत भंगार दुकानांवर महानगरपालिकेची धडक

### चार ट्रक भंगार साहित्य जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती** शहरातील अनधिकृत भंगार दुकानांविरोधात अमरावती महानगरपालिकेने मोठी कारवाई करत सुमारे चार ट्रक भंगार साहित्य जप्त केले. आयुक्त वर्षा लड्डा यांच्या आदेशान्वये व सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलन विभागाने ही मोहीम राबविली.अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली अन्सार अहमद व संदीप सोनोने यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. श्याम चौक येथील बीएसएनएल कार्यालयाच्या मागील भागात, जुने तहसील कार्यालय परिसरात तसेच जवाहर गेट रोडलगत अनधिकृतपणे सुरू असलेल्या भंगार दुकानांचे अतिक्रमण हटविण्यात आले.कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य जप्त करण्यात आले असून ते कंपोस्ट डेपो येथे जमा करण्यात आले आहे. या मोहिमेत पोलीस कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते. महानगरपालिकेने शहरातील अनधिकृत व्यवसाय व अतिक्रमणांविरोधात पुढेही अशीच कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# पंचायत समिती आवारातील घटनाकार्यालयाच्या आगीची सीआयडी चौकशी करा !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर पंचायत समिती आवारातील एकात्मिक बाल विकास कार्यालयाला ८ जून रोजी भीषण आग लागली. आगीत लाडकी बहीण, लेक लाडकी योजनांचे हजारो अर्ज, पोषण आहार, बेबी किट्स व अंगणवाडी सेविकांच्या नोंदवह्या जळून खाक झाले. याघटनेचीसिआयडी चौकशी करण्यात यावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

संशयास्पद बाब म्हणजे आगीच्या २ दिवस आधीच कार्यालयाचा वीजपुरवठा बंद होता. शॉर्टसर्किटशिवाय आग लागली कशी ? आर्थिक घोटाळा - लपविण्यासाठी आग लावली का, असा संशय



माकपच्या वतीने जल्हाधिकारी यांना दिलेल्या वेदनात व्यक्त करण्यात आला. भागीय आयुक्त, मुख्यकार्यपालन

अधिकारी, जिल्हा परिषद अमरावतीयांनासुद्धा निवेदन देण्यात आले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉ. शाम शिदे यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन देऊन प्रकरण सीआयडीकडे वर्ग करून दोषींवर कारवाईची मागणी केली. जळालेल्या कागदपत्रांमुळे कोणत्याही लाभार्थींला योजनेचा लाभनाकारूनये, अशीलेखीहमीही मागितली. प्रशासनाने दखल न घेतल्यास जनतेची एकजूट करून दिलेल्या निवेदनातुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष नांदगाव खंडेश्वर तालुकासचिवकॉ. शामशिदे, सुभाष पांडे, मोहसीन शेख, दिलीप महल्ले, अशोक केसरखाने, शहेनशहा, शैलेश कटाने, किशोर शिदे या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी निवेदन दिले.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# हेल्मेटशिवाय दुचाकी चालविणाऱ्यांवर होणार कारवाई

## अमरावती ग्रामीण पोलिसांची २२ जूनपासून विशेष मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्या साठी आणि नागरिकां च्या जीविताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलिसांनी दुचाकी चालकांसह मागील आसनावरील प्रवाशा साठी हेल्मेट वापरणे बंधनकारक केले आहे. याबाबत पोलीस अधीक्षक कार्यालया कडून जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून दि. २२ जून २०२६ पासून विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे.जिल्ह्यातील राष्ट्रीय



महामार्ग, राज्य महामार्ग, ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व रस्त्यांवर ही सक्ती लागू राहील. हेल्मेट न वापरता वाहन चालविताना किंवा प्रवास करताना आढळल्यास संबंधितांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.तसेच गंभीर उल्लंघन करणाऱ्यांचे ड्रायव्हिंग लायसन्स तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. सुरक्षित प्रवास, सुरक्षित परिवार हा संदेश देत अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले आहे. हेल्मेट हे केवळ दंड टाळण्याचे साधन नसून स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेचे प्रभावी कवच असल्याचे त्यांनी स्पस्ट केले.

# जिल्ह्यातील १७५ रस्त्यांचे जनता करणार 'ऑडिट'

## गुणवत्तेसाठी जिल्हा परिषदेची नागरिकांना साद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत ग्रामीण भागातील मार्ग व इतर जिल्हा मार्गांच्या बांधकामासह देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यात येतात. सध्या जिल्हा परिषदेकडे रस्ते विकास योजनेअंतर्गत ६४३४.१४ कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग तसेच ९९५.४० कि.मी. लांबीचे इतर जिल्हा मार्ग आहेत.या रस्त्यांच्या बांधकाम व देखभाल-दुरुस्तीसाठी मुख्यत्वे जिल्हा नियोजन समिती तसेच शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून दिला जातो. शासनाच्या नियमानुसार रस्त्यांचे बांधकाम, मजबुतीकरण अथवा नूतनीकरण पूर्ण झाल्यानंतर संबंधित कामासाठी दोन वर्षांचा दोष दायित्व निवारण कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने काम पूर्ण झाल्याच्या दिनांकांपासून दोन वर्षाचा कालावधी होईपर्यंत कंत्राटदारा मार्फत दोष निवारणाचे काम करून घेण्यात येते.

सद्यस्थितीत जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत



बांधकाम, मजबुतीकरण व नूतनीकरण करण्यात आलेल्या १२४ ग्रामीण मार्ग तसेच ५१ इतर जिल्हा मार्ग अशा एकूण १७५ रस्त्यांचा दोष दायित्व निवारण कालावधी अद्याप सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे दोष, खड्डे, तडे अथवा पृष्ठभागाची हानी आढळून आल्यास संबंधित कंत्राटदाराकडून आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांच्या माहितीसाठी दोष दायित्व कालावधीत असलेल्या रस्त्यांची यादी जिल्हा परिषद अमरावतीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी यादीतील रस्त्यांवर खड्डे, तडे किंवा अन्य दोष आढळल्यास कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अमरावती यांच्या कार्यालयास तात्काळ कळवावे.नागरिकांनी दोष दायित्व कालावधीत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे, तडे अथवा अन्य दोषांची माहिती बांधकाम विभागास दिल्यास संबंधित कंत्राटदारामार्फत समय मर्यादेत आवश्यक कार्यवाही करून दोष निर्मूलन करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, दोष दायित्व कालावधीत असलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे दोष आढळल्यास त्याची माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे द्यावी. नागरिकांच्या सहकार्यामुळे रस्त्यांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यास मदत होईल तसेच दोषांचे तातडीने निवारण करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यात ११ लाख २२ हजार पाठपुस्तके दाखल

## शाळेत पहिल्याच दिवशी पुस्तके होणार वाटप : शिक्षण विभागाकडून नियोजन सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानित शाळेत इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच दिवशी पाठपुस्तके, गणवेश देण्याचे निर्देश दिले आहेत. यात जिल्ह्यातील २ हजार ४१७ शाळेतील सुमारे १ लाख ७९ हजार ३८१ विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता सुमारे ११ लाख २२ हजार ७२२ पुस्तकांचे संच मागणी नोंदविण्यात आली होती. यामध्ये इयत्ता पहिली तरे पाचवी करिता ५ लाख १८ हजार ८४९ तर इयत्ता सहावी ते आठवी मधील विद्यार्थ्यांसाठी ६ लाख ३ हजार ८३७ पुस्तकांचे संचाचा समावेश आहे. पहिल्या टप्यात ७५ टक्के पाठ्यपुस्तकांच्या संचाचा पुरवठा झाला असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

उर्वरित संचही लवकरच उपलब्ध होणार असल्याचेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले. दरवर्षी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेसह अन्य स्थानिक स्वराज्य संख्या, शासकीय अनुदानित शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीमध्ये



शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून बालभारतीकडे पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली होती. त्यानुसार शिक्षण विभागाला जिल्ह्यातील २ हजार ४१७ शाळेमधील सुमारे १ लाख ७९ हजार ३८१ विद्यार्थ्यांना ११ लाख २२ हजार ७२२ इतक्या पाठ्यपुस्तकांच्या संचाचे वाटप होणार आहे. नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्यासाठी आता आठवडाभराचा अवधी शिल्लक आहे. त्यानुसार जिल्ह्यात बालभारतीकडून पहिल्या टप्प्यात ७५ टक्के पाठ्यपुस्तक संच दाखल झाले आहेत. उर्वरित संचही येत्या काही दिवसात उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरण करण्याचे दृष्टीने शिक्षण विभागाने नियोजन सुरू केले जात असल्याचे शिक्षण विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

# नेत्रदानाचा संदेश घेऊन हरिना फाऊंडेशनची जनजागृती पदयात्रा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती** नेत्रदान हे मोठे दान आहे. या कार्यात ज्या परिवारांनी आपले योगदान दिले, त्यांचा मी मनापासून आभारी आहे. त्यांच्या परिवारांनी केवळ नेत्रदान किंवा अवयव दान केले नसून, एखाद्याच्या अंधकारमय जिवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य केले. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी अवयवदान, देहदान सारख्या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवानी यांनी केले. स्थानिक राजकमल चौकात बुधवारी हरिना फाऊंडेशन व हरीना नेत्रदान समितीच्या वतीने विश्व नेत्रदान दिनानिमित्त मेरे जीवन का अंतीम उपहार-राष्ट्र के नाम अभियान अंतर्गत भव्य पदयात्रा व नेत्रदान , अवयवदान, देहदान परिवारांचा कृतज्ञता समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते त्यानंतर राजकमल चौकातूनजनजागृती पदयात्रा काढण्यात आली. यावेळी अभिनेता भारत गणेशपुरे यांनी हिरवी झेंडी दाखवली. शाम चौक, बापट चौक, प्रभात टॉकीज, जवाहर रोड, सरोज चौक, जयस्तंभ, सिटी कोतवाली पासून राजकमल चौकावर समारोप झाला. पदयात्रेत आ रवि राणा, यश खोड़के यांची उपस्थिती लाभली.

# अंगणवाडीच्या चिक्कीमध्ये निघाल्या अळया

## चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११पथ्रोट,**

कुपोषण निर्मूलनासाठी नवीन आहाराचा समावेश करण्यात येत असून त्यातीलच एक भाग म्हणून सरकारने अंगणवाडीत शेंगदाण्याच्या चिक्कीचा पुरवठा सुरू केला. त्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करण्यात येत आहे. पथ्रोट येथील वार्ड क्रमांक सहा खोडगाव रस्ता येथील अंगणवाडी केंद्रातून वाटप करण्यात आलेल्या चिक्कीत सोंडे व अळया निघाले आहेत. सदरचा प्रकार हा चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ करणारा ठरत असल्याने याला जबाबदार असणारे अधिकारी, ठेकेदार या सर्वावरच कडक कारवाई करण्याची मागणी पालकांनी





केली आहे.

मंगळवार ९ जून रोजी निकिता अनिल दांडगे या सदर अंगणवाडी केंद्रावर पोषण आहार घेण्यासाठी गेल्या असता त्यांच्या विश्व अनिल दांडगे (वय तीन) या मुलासाठी तेथील अंगणवाडी सेविकेने तीन महिन्याचा साठा म्हणून एकत्रित शेंगदाणा चिक्कीचे पाकीट दिले. ते पाकीट घरी आणल्यानंतर मुलाला खाण्यासाठी देताना फोडले असता त्यामधून पांढर्या आळ्या व लाल तोंडे फिरत असल्याचे दिसून आले. हा प्रकार पाहून निकिता दांडगे पूर्णतः घाबरल्या. महिला व बालविकास विभागाकडून पुरवण्यात येत असलेले चिक्की खराब निघत असल्यामुळे पालकांनी जर न पाहता मुलाला खायला दिले तर चिमुकल्यांच्या जीवावर बेतू शकते.अंगणवाडीमध्ये शून्य ते तीन वर्ष वयोगटातील चिमुकल्यांना विविध प्रकारचा पोषण आहार शासनाकडून पुरवण्यात येत असतो. अशावेळी सुपरवायझर ते अंगणवाडी सेविकेपर्यंत सर्वांनीच त्याची पूर्तता करून खात्री करणे व ते योग्य आहे की नाही याची तपासणी करणे अनिवार्य आहे. पुरवठा ठेकेदार यांनी सुद्धा यावर लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु, या प्रकरणात सदर विभागाकडून पूर्णतः दुर्लक्ष केल्या गेलेले दिसत आहे. प्रशासन व संबंधित विभाग कारवाई बाबत काय पाऊल उचलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात पंचायत समिती अचलपूर येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी वैभवकुमार मापते

यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी घटनेचा पंचनामा करून तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात येईल, असे सांगितले.

### संबंधितांवर कारवाई करावी

अंगणवाडीतून दिलेली शेंगदाणा चिक्की पूर्णतः निकृष्ट असून अळ्यांनी व सोंड्यांनी भरलेली होती. खायला देण्या अगोदर पाहिल्यामुळे हा अनर्थ टळला याला जबाबदार असणार्या अधिकारी व कर्मचार्यावर कारवाई करण्यात यावी.

**-निकिता दांडगे**
**लाभार्थी माता, पथ्रोट.**

# खरीप हंगाम तोंडावर; कर्जाशिवाय शेती करणे झाले कठीण उत्पादन खर्च वाढला

## शेतकऱ्यांमध्ये चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

खरीप हंगाम तोंडावर आला असताना रासायनिक खते, बियाणे आणि कीटकनाशकांच्या वाढलेल्या किमतींमुळे शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे. खतांच्या दरात १५ ते २० टक्के, तर काही संकरित बियाण्यांच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. पेरणीपूर्व मशागत, बियाणे, खते व औषधांवर प्रतिहेक्टर सुमारे २० हजार रुपयांपर्यंत खर्च होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतीची आर्थिक घडी विस्कटत आहे. कापूस, सोयाबीन आणि तूर उत्पादक शेतकरी गेल्या काही वर्षांपासून आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. दरम्यान, राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीककर्ज मिळवितानाही अनेक शेतकऱ्यांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. कर्जमाफी जाहीर झाल्यानंतरही अनेक ठिकाणी लाभार्थी यादीची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने नवीन कर्जासाठी शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत. बाजारात डीएपी, यूरिया आणि पोटॅश खतांच्या किमती वाढल्या असून काही ठिकाणी कृत्रिम टंचाई व



काळाबाजाराच्या तक्रारीही पुढे येत आहेत. कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांच्या बियाण्यांच्या किमतीतही वाढ झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यातच हवामान विभागाने यंदा कमी पावसाची शक्यता व्यक्त केल्याने खरीप हंगामाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे खत-बियाण्यांवरील अनुदान वाढवावे, जीएसटी कमी करावा आणि काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

खरीप हंगामासाठी बियाण्यांची गरज सोयाबीन - ६५ हजार क्विंटल कापूस - १.२५ लाख बियाणे पाकिटे तूर - ४, ७६० क्विंटल मका - ७, ०७२ क्विंटल ज्वारी - ४५० क्विंटल मूग - ५१.६ क्विंटल उडीद - ७६.८ क्विंटल भात व भुईमूग - ४८६ क्विंटल

# घोडगावात दोन गटांत मारहाण, तिघे जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ घोडगाव कविठा-** परतवाडा ठाण्याच्या हद्दीत घोडगाव कविठा येथे क्षुल्लक कारणावरून दोन गटांत झालेल्या वादात हाणामारी करण्यात आली. त्यात दोन्ही गटांतील तिघे जखमी झाले. परस्परविरुद्ध तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी दोन्ही गटांतील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भीमराव भयामराव आमझरे (वय ७०) व त्यांच्या मुलीला संशयित हेमंत भीमराव आमझरे (वय ३८) याने मोगरीने मारहाण करून जखमी केले. जखमी भीमराव आमझरे यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी संशयित हेमंत आमझरेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परस्परविरुद्ध बाजूने हेमंत भीमराव आमझरे यांनी तक्रार केली. त्यात संशयित भीमराव भयामराव आमझरे (वय ७०), यांच्यासह दोन महिला पत्नीला मारण्यास गेल्या असता तिला वाचविण्यासाठी हेमंत आमझरे हे धावले. त्यांनाच संशयितांनी काठीने मारून जखमी केल्याचा आरोप हेमंत यांनी तक्रारीत केला. त्याआधारे तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अन्य एका घटनेत मंगरूळदस्तगीर ठाण्याच्या हद्दीत एका गावात येण्या-जाण्याच्या मार्गात बांबूच्या काठ्या ठेवल्या होत्या. त्यासाठी हटकले असता, दोन वृद्ध महिलांमध्ये शाब्दिक चकमकीनंतर वाद वाढला. एकीने दुसरीला विटेच्या तुकड्यांनी मारहाण करून जखमी केले. जखमी वृद्धेच्या तक्रारीवरून दुसऱ्या वृद्धेविरुद्ध मंगरूळदस्तगीर ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# खारपानपट्ट्यातील महिलांचा सेंद्रिय शेतीकडे कल

## घरच्या घरी तयार केला दशपर्णी अर्क

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११दर्यापूर**

टाकरखेडा संभू येथील नारीशक्ती हरितक्रांती महिला शेतकरी गटाने कपाशी पिकासाठी तब्बल २०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला आहे. गटाच्या निमंत्रक पौर्णिमा सवाई यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी हा उपक्रम राबविला. दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी कडुलिंब, सिताफळ, धोत्रा, निरगुडी, रुई, पपई, रायमुनी, गुळवेल, लाल कन्हेर आणि करंज या दहा वनस्पतींचा पाला वापरण्यात आला. यामध्ये दोन किलो हिरवी मिरची, एक किलो लसूण, पाच किलो गूळ आणि पाच लिटर गोमूत्र मिसळून २०० लिटर पाण्यात हे मिश्रण तयार करण्यात आले. हे द्रावण ४० दिवस सावलीत ठेवून दिवसातून दोन वेळा ढवळले जाते. त्यानंतर गाळून फवारणीसाठी वापरले जाते.

दशपर्णी अर्क हे नैसर्गिक कीटकनाशक व बुरशीनाशक म्हणून प्रभावी मानले जाते. पिकावर कीड येण्यापूर्वी फवारणी केल्यास किडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. तसेच शेती शाळा आणि व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून तज्ज्ञांचे



सातत्याने मार्गदर्शन मिळत असल्याने शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत कमी खर्चात अधिक उत्पादनाच्या दिशेने वाटचाल करत आहेत. या उपक्रमात संगीता नाचनकर, जयश्री लाळे, कुसुम मेश्राम, पूजा शेंडे, छाया सवाई, अरुणा लाळे, पुष्पा जामठे, उज्वला पिंगळे, वृंदा मानकर आणि सुशीला मेश्राम यांचा सहभाग होता.

रासायनिक कीटकनाशकांवरील खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळते. या उपक्रमामुळे शेतकर्यांमध्ये सेंद्रिय कीटकनाशक निर्मितीबाबत जागरूकता वाढत असून उत्पादन खर्च कमी करण्यासाठी मोठी मदत होत आहे. मुलांनीही निंबोळ्या गोळा करण्यास सुरुवात केली आहे. डिजिटल

### १० गटांनी तयार केला अर्क

तालुक्यातील ७९ शेतकरी गटांनी फार्मर कप स्पर्धेत सहभाग घेतला आहे. आतापर्यंत १० गटांनी दशपर्णी अर्क तयार केला असून पुढील आठवड्यात बहुतांश गट हा उपक्रम राबवतील. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांवरील अवास्तव खर्च कमी करण्यास मदत होईल.

**-रूपाली ठाकरे, मेंटर कृषी विभाग.**


# काँग्रेसचे सर्व आरोप डॉ.अनिल बोंडे यांनी फेटाळले

## यशोमती ठाकूर यांच्या आरोपांना प्रत्यूत्तर; चौकशीचे खुले आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी उमेदवारांवर १५ ते २० कोटी रुपये घेऊन व्यवस्थापन (मॅनेज) झाल्याचा केलेला आरोप भाजपचे राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनी ठामपणे फेटाळून लावला आहे. आरोपांमध्ये तथ्य असल्यास सीबीआय, ईडी किंवा कोणत्याही सक्षम चौकशी यंत्रणेमार्फत चौकशी करण्यास आम्ही तयार असल्याचे सांगत त्यांनी काँग्रेसलाच प्रतिप्रश्नांचा भडिमार केला.

यशोमती ठाकूर यांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बोंडे म्हणाले की, काँग्रेसने ज्या उमेदवाराला तिकीट दिले, त्यावेळीत्या उमेदवाराची पार्श्वभूमी, विश्वासार्हता आणि राजकीय कामगिरी तपासली गेली नव्हती का? उमेदवारी जाहीर करताना प्रदेशाध्यक्ष,



पक्षाचे वरिष्ठ नेते आणि संपूर्ण पक्ष संघटनेने जबाबदारी घेतलेली नव्हती का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.बोंडे म्हणाले की, आज जर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडूनच त्यांच्या उमेदवारांवर गंभीर आरोप केले जात असतील, तर सर्वप्रथम काँग्रेसनेच निष्पक्ष चौकशीची मागणी करायला हवी. सीबीआय, ईडी किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी आणि सत्य जनतेसमोर यावे, अशी भूमिका काँग्रेसने घ्यावी.

मात्र चौकशीची मागणी केल्यानंतर त्याच यंत्रणांवर संशय व्यक्त करणे किंवा त्यांची विश्वासार्हता नाकारणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रवीण पोटे यांच्या विजयाचा विश्वास

विधान परिषद निवडणुकीबाबत बोलताना अनिल बोंडे यांनी भाजप महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाले असून जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये महायुतीचे सदस्य संख्याबळाने आघाडीवर आहेत.त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीत प्रवीण पोटे यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळेल, असा दावा त्यांनी केला.महानगरपालिका, नगरपरिषद आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले प्रतिनिधी मोठ्या संख्येने प्रवीण पोटे यांच्या पाठीशी उभे राहतील. त्यामुळे ते मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास बोंडे यांनी व्यक्त केला.

### काँग्रेसच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

काँग्रेसच्या अंतर्गत परिस्थितीवर भाष्य करताना बोंडे यांनी पक्षाच्या उमेदवार निवड प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित केले. जर काँग्रेसच्या नेत्यांनाच स्वतःच्या उमेदवारांबाबत गंभीर शंका असतील, तर त्यांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. विरोधकांवर आरोप करण्यापेक्षा पक्षाच्या निर्णय प्रक्रियेचे आणि उमेदवार निवडीच्या निकषांचे पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ काँग्रेसवर आली आहे, असे ते म्हणाले.-

# रेडी रेकनर दरांमध्ये मोठा बदल; गरीब आणि मध्यमवर्गीयांना दिलासा



## अमरावती विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे पारडे जड- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नागपूर** राज्य शासनाने रेडी रेकनर दर निर्धारणात ऐतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला असून यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध राजकीय आणि प्रशासकीय विषयांवर भूमिका स्पष्ट केली.रेडी रेकनर दराबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, आतापर्यंत मोठ्या व्यावसायिक इमारती आणि छोट्या घरांना अनेक ठिकाणी समान दर लागू होत होते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत होता. आता राज्य शासनाने 'मायक्रो झोन' संकल्पना स्वीकारली असून परिसर, बांधकामाचा प्रकार आणि मालमत्तेच्या स्वरूपानुसार स्वतंत्र रेडी रेकनर दर निश्चित केले जाणार आहेत. यामुळे मोठ्या इमारतींना वेगळा तर सर्वसामान्यांच्या घरांना स्वतंत्र दर लागू होईल आणि घर खरेदी-विक्रीवरील शुल्काचा भार कमी होईल, असे त्यांनी सांगितले.अमरावती विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे पारडे जडअमरावती विधान परिषद निवडणुकीत दबाव टाकल्याच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी हे आरोप फेटाळून लावले. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असून कोणावर दबाव टाकण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी सांगितले. विरोधकांचा पराभव निश्चित असल्याने अशा प्रकारची विधाने केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. अमरावतीसह इतर भागांतील राजकीय परिस्थितीचा उल्लेख करत महायुतीच्या विजयाचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# काटेपूर्णा नदीपात्रात आंघोळ व पूजेसाठी गेलेले ४ जण बुडाले; मायलेकाचा करुण अंत!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अकोला :** अधिक मासानिमित्त काटेपूर्णा नदीपात्रात अंघोळ व पूजेसाठी गेलेल्या तीन महिला व एक मुलगा बुडाल्याची हृदयद्रावक घटना मूर्तिजापूर तालुक्यातील समशेरपुर गावाजवळ आज, ११ जून रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत बुडाल्याने मायलेकाचा करुण अंत झाला. इतर दोन महिला बचावल्या असून त्यांच्यावर अकोला सर्वोपचार रुग्णालयात उपचार केले जात आहेत. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात असून परिसरात शोककाळा पसरली आहे.



नेमकी घटना काय?

अकोला जिल्ह्याच्या मूर्तिजापूर तालुक्यातील समशेरपुर गावातील तीन महिला व एक मुलगा गावाजवळ असलेल्या काटेपूर्णा नदीपात्रात अंघोळ करण्यासाठी आज सकाळी गेले होते. यावेळी वृषाली हरिदास खोत (३५), त्यांचा मुलगा स्वराज हरिदास खोत (१०), माधुरी उमेश खोत व मीरा श्यासुंदर चौधरी हे चार जण अचानक नदी पात्रात बुडाले. या घटनेत वृषाली खोत व स्वराज खोत यांचा नदीत बुडून मृत्यू झाला, तर इतर दोन महिला वाचल्या आहेत.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावर धाव

घटनेची वार्ता परिसरात वाऱ्यासारखी पसरली. ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळावर दाखल झाले. घटनेची माहिती महसूल प्रशासन व पोलीस विभागाला देण्यात आली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेतली. बुडतांना वाचलेल्या दोन महिलांना उपचारार्थ अकोला सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बुडालेल्या मायलेकाच्या मृतदेहाचा गावकऱ्यांच्या मदतीने शोध लागला असून उत्तरीय तपासणीसाठी मूर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. प्रशासनाच्यावतीने घटनेचा पंचनामा केला आहे.

# पावसाळा आला, मात्र टँकर वाढले

## मेळघाटातील स्थिती गंभीर : विहीर अधिग्रहणात वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-** जून महिन्याचा पहिला आठवडा कोरडा गेला असून सर्वांनाच प्रतीक्षा आहे ती दमदार पावसाची. पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांसह सारेच चिंताग्रस्त झाले आहेत.

दुसरीकडे मेळघाटातील पाणीटंचाई मात्र अद्यापही कायम असून आणखी चार गावांची तहान भागविण्यासाठी टँकर लावण्यात आले आहेत. दरवर्षी मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील शेकडो गावांना पाणीटंचाईचा फटका बसत असतो.

यंदा तर फेब्रुवारीपासूनच नागरिकांना पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली. त्यानंतर



एप्रिल, मे व सध्याच्या जून महिन्यात जलसंकट अधिक गडद झाले आहे. चिखलदरा तालुक्यातील १३ गावांना २६ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्यासाठी नागरिकांना विशेष करून महिलांना भटकंती करावी लागत आहे. गावातील एकाच विहिरीत टँकरचे पाणी सोडले जात असल्याने पाण्यासाठी विहिरीवर दिवसभर गर्दी होत आहे.

हीच परिस्थिती जून महिन्यात सुद्धा कायम आहे. आता सर्वांना प्रतीक्षा आहे ती दमदार पावसाची. मागील काही दिवसांत आणखी चार गावांत टँकर लागल्याची माहिती चिखलदरा पंचायत समितीचे पाणीपुरवठा अधिकारी आदित्य तारू यांनी सांगितले.

### या गावांत लागले टँकर

मोथा, खडीमल, गौलखेडा बाजार, बहाद्दरपूर, आकी, मेहरियम, आलाडोह, लवादा, गवळीढाणा, कालिदा, मसोंडी, बोरी, जामली वन.

टंचाई निर्मूलन आराखडा संभाव्य पाणीटंचाईग्रस्त गावांची संख्या : ५४५, नळयोजना ५३७, हातपंप : १७७२, खासगी विहिरींचे अधिग्रहण : १४३, टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांची संख्या : १६: नळयोजनांची विशेष दुरुस्ती : २८६, नवीन सिंचन विहिरी व कूपनलिका : ९७, स्रोत बळकटीकरण : १२६

चिखलदरा तालुक्यातील ज्या गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे, त्या गावांना मागणीनुसार टँकर पुरविण्यात येत आहे. याशिवाय विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. पाऊस लवकर पडल्यास या परिस्थितीत बराचसा बदल होईल.

**स्नेहा धावडे,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि. प.

# 'देऊळ बंद २'ची २० दिवसांत ७५ कोटींची कमाई

## शेतकरी आत्महत्या रोखण्याचा संदेश; चित्रपटाच्या कमाईतून शेतकऱ्याच्या मुला मुलीच्या शिक्षणासाठी निधी देण्याची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेल्या 'देऊळ बंद २' या मराठी चित्रपटाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या २० दिवसांत चित्रपटाने ७५ कोटी रुपयांची कमाई केल्याची माहिती चित्रपटाच्या टीमकडून देण्यात आली. विशेष म्हणजे, चित्रपटातून मिळालेली संपूर्ण कमाई शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी देण्याचा निर्णय निर्मात्यांनी जाहीर केला आहे.



चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक प्रविण विठ्ठल तरडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या वेदना, संघर्ष आणि जीवनातील आशेचा संदेश या चित्रपटातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाजात सकारात्मक विचार निर्माण करून संकटांचा सामना करण्याची प्रेरणा देणे हा चित्रपटाचा मुख्य उद्देश आहे. चित्रपट पाहिल्यानंतर अनेक प्रेक्षकांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केल्या असून, शेतकऱ्यांनी निराश न होता संघर्षातून मार्ग काढावा, असा संदेश चित्रपटातून देण्यात आला आहे. त्यामुळे 'देऊळ बंद २' हा केवळ मनोरंजनाचा नव्हे तर सामाजिक जाणीव जागवणारा चित्रपट ठरत असल्याची चर्चा आहे.

# कौंडण्यपूर येथील पालखीचे १९ जूनला पंढरपूरकडे प्रस्थान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११कुऱ्हा**



श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून आषाढी वारीनिमित्त मानाच्या पायदळ पालखी सोहळ्याचे प्रस्थान शुक्रवारी (ता. १९) दुपारी चार वाजता होणार आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूरच्या वतीने आयोजित हा पालखी सोहळा २९ जुलैपर्यंत पंढरपूर येथे पोहोचणार आहे. वर्धा नदीच्या तीरावर वसलेल्या या पुरातन तीर्थक्षेत्राला ऐतिहासिक, धार्मिक आणि पौराणिक महत्त्व लाभले आहे. संत सद्गुरू सदाराम महाराज यांनी १५९४ मध्ये कौंडण्यपूर ते पंढरपूर ही पायदळ वारी सुरू केली. त्यानंतर अखंडपणे सुरू असलेल्या या परंपरेला यंदा ४३२ वे वर्ष पूर्ण होत आहे. आई रुक्मिणी मातेच्या माहेरातून निघणारी ही महाराष्ट्रातील एकमेव मानाची पालखी मानली जाते. श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त मंडळ आणि वारकरी पंचकमिटी यांच्या नेतृत्वाखाली हा पालखी सोहळा पार पडणार आहे.

यानिमित्ताने पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पालखी सोहळ्याला शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखलदरा हिरवेगार करण्याचा नगरपरिषदेचा संकल्प

## 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत वृक्षारोपण; शहरात व्यापक वृक्षलागवडीचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११चिखलदरा**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिखलदरा नगरपरिषदेतर्फे 'माझी वसुंधरा अभियान' व 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांच्या हस्ते वृक्षपूजन करून कार्यक्रमाची सुरवात झाली. यावेळी नगरपरिषदेच्या वतीने चिखलदरा शहर हिरवेगार करण्याचा संकल्प करण्यात आला. नगरपरिषद परिसरातील सेल्फी पॉइंट येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष प्रमोद नाईक, शिक्षण सभापती रूपेश चौबे,



महिला व बालकल्याण सभापती शबाना परवीन शेख नासीर, नगरसेविका शिवकन्या वरघट, स्वीटी कासदेकर, तमन्ना शेख बिराम, नगरसेवक महेशसिंग सोमवंशी यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांनी संपूर्ण चिखलदरा शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा मानस व्यक्त केला. गणपती संग्रहालय मार्गापासून चिखलदरा शहरापर्यंत तसेच विविध पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करून हरित पट्टा निर्माण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसहभागातून वृक्षलागवड झाल्यास वृक्षांचे संवर्धन आणि जतन अधिक प्रभावीपणे होईल, असेही त्यांनी नमूद केले. 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत महिलांनी पुढाकार घेऊन विविध ठिकाणी वृक्षलागवड करावी व लावलेल्या वृक्षांचे संगोपन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान घनकचरा व्यवस्थापन नियमांची माहिती देण्यात आली. तसेच 'माझी वसुंधरा' अभियानाची शपथ उपस्थितांना देण्यात आली. नंदनवन शहर उपजीविका केंद्राच्या पदाधिकारी व सदस्यांचाही कार्यक्रमात सहभाग होता. संचालन राजेश अटवर्धन यांनी केले.शहराचे वैभव पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न गणपती संग्रहालयापासून चिखलदरा शहरापर्यंत तसेच विविध पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा आमचा संकल्प आहे. चिखलदरा शहराला त्याचे नैसर्गिक हरित वैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील राहील, असे नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांनी सांगितले.